देशोन्नती

दि 10-11-23

आपला जिल्हा

# नाकाबंदी दरम्यान फरार आरोपी गावठी पिस्तुलसह स्थागुशाच्या ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ जिल्ह्यात ७ नोव्हेंबर रोजी रात्री पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या आदेशाने नाकाबंदी व कॉबींग ऑपरेशन राबविण्यात आले होते.या मोहीमअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील फरार आरोपीस आसना पुलाजवळ ताब्यात घेतले असून त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल जप्त केले आहे.

सदर नाकाबंदी व कॉबींग ऑपरेशन करीता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी नांदेड शहरात नाकाबंदी व कोबींग ऑपरेशनसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे दोन पथक तयार करुन योग्य त्या सुचना देवुन दोन्ही पथकाचे सोबत पंचासह शहरात रवाना केले. विमानतळ हद्दीतील कोबींग ऑपरेशन दरम्यान पेट्रोलिंग करीत असतांना पोउपनि दत्तात्रय काळे यांना अर्धापुरकडुन नांदेडकडे शिवाजीनगर येथील गुन्ह्यातील फरारी असलेला आरोपी रोहन कांबळे हा येणार आहे, अशी माहिती मिळाली. या माहितीवरुन त्यांनी आसना नदीचे अलीकडील चौकात नाकाबंदी लावली होती. त्यावेळी पहाटे १.४० वाजता एक इसम संशयीतरित्या अर्धापुर कडुन बुलेटवर आला असता त्यास थांबवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव रोहन कांबळे (२८) रा. सिध्दार्थ नगर तरोडा बु. असे सांगीतले.त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्या ताब्यातुन एक गावठी पिस्तूल व ३ जिवंत काडतुस व एक बुलेट असे किंमती १ लाख ७८ हजार रुपयाचा माल जप्त करण्यात आला. सदर इसमाचे विरुध्द विमानतळ पोलिस ठाण्यात पोउपनि दत्तात्रय काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या पथकात स्थागुशाचे पोनि जगदीश भंडरवार, पोउपनि दत्तात्रय काळे, पोहेकॉ गंगाधर कदम, बालाजी तेलंग, गणेश धुमाळ, रणधीर राजबन्शी, ज्वालासिंग बावरी, गजानन बयनवाड, देवा चव्हाण, बालाजी मुंडे यांचा समावेश होता.

